देऊन त्वा माझ्यावर उपकार केलास, आता ह्ये आरूसं नि कावडणी देऊन मी त्या उपकाराची फेड करतो. ह्ये घेऊन जा नि वढ आपली म्हस.''[३] हे ऐकून गावकरी चकित होतात. वरवर विनोदी वाटणारी ही कथा अस्पृश्य वर्गातही उच्चनीचतेच्या कल्पना कशा अस्तित्वात आहेत याकडे लक्ष वेधते. अस्पृश्य जातीच्या व्यथा-वेदना एक असूनही त्यांच्यातील जातीयता संपुष्टात येत नाही, हा एक भारतीय समाजव्यवस्थेसमोरचा गंभीर प्रश्न आहे. यामुळेच मलू सारखा जागृत तरुण या जातीयतेच्या विरोधात विद्रोह पुकारतो.

'थड्यतील हाडं' ही कथा खेड्यतील अस्पृश्यजातींवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडणारी आहे. तारगावच्या रक्षणासाठी मांग-महार आणि रामोशी मोठा त्याग करतात. या त्यागाचे प्रतीक म्हणजे रायनाक महार. या रायनाक महाराच्या स्मरणार्थ तारगावात दरवर्षी भंडारा केला जातो. या भंडाऱ्यात रायनाक महाराच्या वारसदारांना मात्र सन्मान दिला जात नाही. त्यामुळे गावचा पाटील आणि मांग, महार, रामोशी यांच्यात संघर्ष निर्माण होतो. कथेचा प्रारंभच भंडाऱ्याच्या वर्णनातून होतो. भंडाऱ्यात पंगतीची वाट पाहात उपाशीपोटी जांभया देत महार-मांग बसलेले असतात. पुढे राणोजी नावाचा रामोशी थड्यतल्या हांडांची कुळकथा सांगतो. मांग, महार आणि रामोशी जातीतल्या अनेक शूरवीरांनी तारगावच्या रक्षणासाठी प्राण दिलेला असतो. असे असूनही या शूरवीरांच्या वारसदारांना गाव भंडाऱ्यात सन्मानाने जेवायला दिले जात नाही. ''खीर संपली म्हणून कसा बसा प्रसाद घेऊन जावा'' असे गावचा पाटील म्हणतो. पाटलाची ही विनंती धुडकावून लावत राणोजी आणि त्याचे सहकारी भंडाऱ्याकडे पाठ फिरवून निघून जातात. गावगाड्यतील हा भेदभाव लेखकाने मार्मिक भाषेत चित्रित केला आहे. गावातील जातवास्तव माणसाला कसे अपमानित करते याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'थड्यतील हाडं' ही कथा होय. कथेच्या शेवटी प्रसाद न घेताच उठून जाणारे महार, मांग, रामोशी बंडखोर वाटतात. त्यांचा स्वाभिमान दुखावल्यामुळे ते असे करतात. राणोजीच्या बोलण्यातून तर हा स्वाभिमान प्रखरतेने जाणवतो. तो आपल्या सहकाऱ्यांना म्हणतो, ''जावा घरला नि दुसरा भंडारा घाला. पर ह्ये मेल्याचं अन्न खाऊ नका... नगं आमास्नी तुमचा परसाद!''[४] यातून मांग, महार, रामोशी जातीच्या मनात असलेली विद्रोहाची भावनाच व्यक्त होते. थोडक्यात, 'थड्यतील हाडं' ही विद्रोही आशय घेऊन येणारी कथा म्हणून महत्त्वाची ठरते.

'वळण' ही चिमा महारीणवर आधारलेली एक महत्त्वाची कथा आहे. महारवाड्यतील चिमा नावाची म्हातारी परंपरागत वळणाप्रमाणे बंडू मांगाकडून रेड्यचा मांस आणून खात असते. चिमा म्हातारी सोडली तर महारवाड्यतील इतर सर्व महार लोक डॉ. आंबेडकरांच्या शोषण मुक्तीच्या आंदोलनामुळे जागृत झालेली असतात. त्यामुळे मेलेल्या जनावरांचे मांस खायचे नाही असे ते ठरवतात. बळी महार हा रेड्यचा मांस खाणाऱ्या महारांना वाळीत टाकत असतो. चिमा महारीणची सवय मात्र काही केल्या मोडत नाही. मांस खाताना जो सापडेल त्याने दंड भरायचा असा नियम असतो. चिमा महारीण अनेकवेळा दंड भरते. तिला वाळीत टाकले जाते. या कारणामुळे महार-मांगांची भांडणं होतात. मास्तर आणि पाटलांच्या मध्यस्थीने वाद तात्पुरता मिटतो. शेवटी चिमा म्हातारीला सत्तर वर्षापासून असलेले वळण बदलता न आल्याने वाईट वाटते. आपले काही बरे वाईट झाले तर भावकी सहकार्य करणार नाही म्हणून एक हजार रुपयाला शेत विकून पाचशे मास्तरकडे ठेवून मरण पावते.

एका अस्पृश्य जातीत जन्माला आल्यानंतर सामाजिक, धार्मिक शोषणामुळे शोषितांच्या जीवनात कशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'वळण' ही कथा होय. परंपरागत जात मानसिकतेच्या बाहेर पडण्यासाठी, आपले हिनत्व कायमचे घालविण्यासाठी मेलेल्या जनावराचे मांस खायचे नाही हा जागृत महारांचा निर्णय म्हणजे विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधातले बंडच म्हणायला हवे. चिमा महारीणला मात्र हे बंड

पचत नाही त्यामुळे तिची शोकांतिका होते. थोडक्यात, 'वळण' ही आंबेडकरवादी विचाराची प्रेरणा घेऊन येणारी एक महत्त्वाची विद्रोही कथा आहे.

दलित, शोषित, उपेक्षित वर्गाचे चित्रण या कथांमधून आलेले आहे. अन्याय अत्याचाराविरुद्ध शोषितांनी उभारलेला लढा, त्यांनी पुकारलेले बंड, विद्रोह हा या कथांचा स्थायीभाव आहे. प्रामुख्याने 'सापळा', 'वळण', 'बुद्धाची शपथ', 'सोन्याचा मणी', 'उपकाराची फेड', 'विठ्ठू महार' या सहा कथांमधून आंबेडकरवादी जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. 'सोन्याचा मणी' मधील बणा महारीण आपल्या मृत्यूनंतर तोंडात टाकण्यासाठी पदरात बांधून ठेवलेला सोन्याचा मणी डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर निवडणूक फंडाला देऊन आपली परिवर्तनावर असलेली निष्ठा व्यक्त करते. 'बुद्धाची शपथ' या कथेत गावातील लहान मुलं बुद्धांची शपथ घेऊन मुंबई गाठतात आणि शपथ खरी करून दाखवतात. 'विठ्ठू महार' ही मराठवाड्यातील खंडाळी गावावर आधारलेली कथा आहे. हसन पाटलाने अपमान केल्यामुळे पेटून उठलेला विठ्ठू "मी महार म्हणून जन्मलो ... परंतु गावाचा पोलिस पाटील म्हणूनच मरणार" अशी घोषणा करून पोलिस पाटील पदाचा अर्ज माघार घेण्यास नकार देतो. अशा अनेक कथांमधून अण्णा भाऊ साठे यांची आंबेडकरवादावरची निष्ठा व्यक्त होते.

अण्णा भाऊंनी अशा असंख्य कथा लिहून मराठी कथेला अपरिचित असणारे जग परिचित करून दिले. त्यांच्या या कथालेखनाचे अतिशय योग्य असे मूल्यमापन प्रा. रा. ग. जाधव यांनी केले आहे. ते लिहितात, ''माणसानं जगलं पाहिजे हा संदेश त्यांनी केवळ दलितांनाच दिला नाही; सर्वांनाच दिला व मुख्य म्हणजे तो आचरून दाखविला. थोर साहित्यिकाचे एक लक्षण नेहमी सांगितले जाते ते असे की, मानवी जीवनविषयक कोणतातरी नैतिक मूल्यभाव तो आपल्या साहित्यातून सूचित करीत असतो. अण्णा भाऊंनी दलितांच्या, पतितांच्या, भणंग भिकाऱ्यांच्या, तथाकथित दरोडेखोरांच्या नि बंडखोरांच्या अर्थशून्य मानल्या गेलेल्या जीवनात माणुसकीची अर्थपूर्णता असल्याचे दाखवून दिले. मानवी सद्गुणांचे नि दुर्गुणांचे, आकांक्षेचे नि अभ्युदयाचे, ध्येयवादाचे नि निष्ठांचे अस्तित्व या उपेक्षितांच्या जीवनातून असल्याचे सिद्ध केले. या दलित पतित जीवनसृष्टीतही मंगल मानवी भावनांचे नि नैसर्गिक मानवी विकारांचे लळित कसे रंगते, हे स्पष्ट केले. जे जग सांस्कृतिक विचारातून व परंपरेतून अर्थहीन म्हणून शतकानुशतके बाद करण्यात आले होते, ते जग अण्णा भाऊंनी प्रतिष्ठित केले, त्याची कदर निर्माण केली.''[५] प्रस्थापितांच्या दृष्टीने गुन्हेगार, खलनायक असणाऱ्या उपेक्षितांच्या जगण्यातील 'नायकत्व' आणि 'बंडखोरी' ही कथा अधोरेखित करते. त्यामुळे 'शोषित माणूस' हा या कथेचा कणा आहे. विद्रोह हा स्थायीभाव आहे. प्रस्थापित व्यवस्थेने उपेक्षित ठेवलेल्या समाज घटकांच्या व्यथा, वेदना, विद्रोह अत्यंत समर्थपणे व्यक्त करण्याचे काम अण्णा भाऊंनी केले आहे. अशा प्रकारे अण्णा भाऊंची कथा शोषितांची, वंचितांची जीवनगाथा आहे.

**संदर्भ सूची :**

1. कुंभार नागोराव (सं.) ,शाहीर अण्णाभाऊ साठे, प्रबोधन ,प्रकाशन लातूर, प. आ. १९९३, पृ. ७१-७२.
2. सावरकर सुभाष ,जनसारस्वत अण्णा भाऊ साठे, मराठी ,जनसाहित्य परिषद अमरावती- २००७, पृ. ३९.
3. साठे अण्णा भाऊ,बरबाद्या कंजारी, विद्यार्थी प्रकाशन पुणे, नवीन आ. २००४, पृ. ९९.
4. साठे अण्णा भाऊ,ठासलेल्या बंदुका, चंद्रकांत शेटÓs प्रकाशन मंदिर कोल्हापूर, चौ. आ. १९९२, पृ. २३.
5. जाधव रा. ग. निळी पहाट, श्रीविद्या प्रकाशन पुणे, चौ. आ. १९९५, पृ. ९०-९१.

Scanned by CamScanner

# परिवर्तनाच्या लढ्याला गतिमान आणि सशक्त बनविणारे विवेकी चिंतन !

डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक, विद्यार्थी विकास विभाग
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी मानवी जीवनातील अनेक महत्त्वाच्या विषयांवर संशोधनात्मक आणि चिंतनशील असे लेखन केले आहे. चार्वाक, बळीराजा, बुद्ध, तुकाराम, फुले आदींच्या साहित्यावर आणि कार्यावर त्यांनी अत्यंत मूलगामी, नवी दिशा दाखविणारे, नवे पैलू लक्षात आणून देणारे, शोषितांच्या सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी करणारे लेखन केले आहे. त्यांचे हे लेखन त्या त्या विषयक्षेत्राचा मानदंड ठरावा, इतके मूलगामी आणि समाजउपयोगी आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावरची त्यांची दोन भाषणे 'हृदयातून हृदयांकडे' या त्यांच्या भाषणसंग्रहात आली आहेत. तसेच 'अण्णा भाऊ साठे – एक सत्यशोधक' या मच्छिंद्र सकटे यांच्या ग्रंथास लिहिलेली प्रस्तावना 'ना गुलाम ना उद्दाम' या लेखसंग्रहातूनही प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्याला नव्या जीवनजाणिवा देणारे, मराठी साहित्याचे दालन वैविध्यपूर्ण अनुभवांनी समृद्ध करणारे १९४० नंतरचे महत्त्वाचे लेखक आहेत. समाजपरिवर्तनाला गतिमान करणाऱ्या प्रेरणा अण्णा भाऊंच्या लेखनातून अत्यंत ताकदीने व्यक्त झाल्या आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, लोकनाट्य, कविता, प्रवासवर्णन इ. वाङ्मयप्रकारात महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या लेखनाचे अलीकडच्या काळात अनेक अभ्यासकांनी, समीक्षकांनी मूल्यमापन केले आहे. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी आपल्या भाषण-लेखनातून अण्णा भाऊंच्या साहित्याचे अनेक नवे महत्त्वाचे पैलू दाखवून दिले आहेत. अण्णा भाऊंचे साहित्य भारतीय समाज जीवनातील अनेक विषय घेऊन येणारे आहे. शोषित-वंचित समाजाचा माणूस म्हणून जगण्यासाठी चालेला संघर्ष, हा त्यांच्या साहित्यविश्वाचा स्थायीभाव आहे. अशा या प्रेरणादायी साहित्याचा अन्वयार्थ डॉ. आ. ह. साळुंखे यांनी लावलेला आहे. हा अन्वयार्थ अनेक दृष्टीने नावीन्यपूर्ण आणि उद्बोधक आहे. अण्णा भाऊंच्या साहित्याकडे अनेक अंगांनी कसे पाहता येते, त्याचे अनेक पैलू कसे नव्याने शोधता येतात, हे या भाषण-लेखनातून त्यांनी अधोरेखित केले आहे.

'अण्णा भाऊंचं चरित्र म्हणजे ज्वालामुखी आणि जलाशय यांचा समन्वय' हा डॉ. आ. ह. साळुंखे यांचा लेख म्हणजे २५ डिसेंबर २०१२ रोजी उस्मानाबाद येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण होय. हे भाषण अण्णा भाऊंच्या साहित्याची समाजउपयोगिता सिद्ध करणारे आहे. या भाषणातून अण्णा भाऊंच्या साहित्यातील अनेक वेदना-संवेदना नव्या परिप्रेक्षातून व्यक्त झाल्या आहेत. अण्णा भाऊंच्या साहित्यात ज्वालामुखी आणि जलाशय या दोन्ही जाणिवांचा समन्वय कसा साधलेला आहे, हे सांगताना ते लिहितात, "अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवनाचा प्रवास करताना, संवेदनशील मन असलेल्या या माणसाच्या अंतरंगात ही परिस्थिती बदलून टाकण्यासाठी विद्रोह करू पाहणारा एक जिवंत ज्वालामुखी होता. हा ज्वालामुखी समाजव्यवस्थेतील अन्याय, विषमता, शोषण यांसारख्या गोष्टी जाळून खाक करू पहात होता. पण या माणसाच्या अंतरंगात त्या ज्वालामुखीच्या शेजारी एक करुणेचा शीतल जलाशयही होता. तो जलाशय आपल्या समाजव्यवस्थेत एक ताजी, प्रसन्न आणि पाहिल्याबरोबर डोळे निवून जातील अशी हिरवळ पिकवू पहात होता. त्यांच्या समग्र साहित्यात आणि वर्तनात हा ज्वालामुखी आणि हा जलाशय यांचा एक सुरेख संगम, एक मधुर समन्वय अखंडपणे अस्तित्वात असल्याचं आढळतं."[१] ज्वालामुखी आणि जलाशय या



Scanned by CamScanner

अण्णा भाऊंच्या साहित्यविश्वाला व जीवनकार्याला अतिशय समर्पक ठरणाऱ्या प्रतिमा लेखकाने याठिकाणी वापरल्या आहेत. अर्थातच, दारिद्र्य, विषमता, शोषण, अज्ञान जाळणारा ज्वालामुखी जसा त्यांच्या साहित्यात आहे, तसा नवनिर्माणाला, सर्जनाला आवश्यक असणारा जलाशयही त्यात आहे.

मस्तकात विद्रोह आणि हृदयात समाजाबद्दल असलेले खरेखुरे कारुण्य घेऊन अण्णा भाऊंनी केलेला जीवनप्रवास आणि लेखनप्रवास अनेकांना थक्क करून सोडणारा आहे. अण्णा भाऊंच्या या प्रवासाची तुलना डॉ. आ. ह. साळुंखे यांनी प्राचीन भारतात होऊन गेलेल्या मातंग पंडिताशी केली आहे. ही तुलना अत्यंत उद्बोधक आणि नवे संदर्भ घेऊन येणारी आहे. प्राचीन काळी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून, अनेक प्रकारच्या अवहेलना सहन करून मातंग पंडिताने ज्ञानाच्या क्षेत्रात कीर्ती प्राप्त केली होती. स्वतः बुद्धांनी या मातंग पंडिताचा गौरव कसा केला होता, हे सांगताना ते लिहितात, "बुद्धांनी एकदा श्रावस्तीमधे असताना एका भारद्वाज ब्राह्मणाला मातंग पंडितांची कर्तबगारी सुनावली होती. वृषल (शूद्र, चांडाळ) कुणाला म्हणावं हे सांगताना त्यांनी त्याला म्हटलं होतं, "जन्मानं कुणी वृषल होत नाही आणि जन्मानं कुणी ब्राह्मण होत नाही. कर्मानं वृषल होतो आणि कर्मानं ब्राह्मण होतो." या सिद्धांताला पुष्टी देण्यासाठी त्यांनी मातंग ऋषींचा उल्लेख केला होता. ते म्हणाले होते, "मातंगानं अत्यंत दुर्लभ अशी श्रेष्ठ कीर्ती प्राप्त केली. त्याच्या सेवेसाठी कित्येक क्षत्रिय आणि ब्राह्मण आले." अतिशय प्रतिकूल परिस्थितीमधे जन्माला आलेले मातंग अत्युच्च स्थानाला पोचले आणि प्रतिष्ठा पावले, या घटनेचा बुद्धांनी मोठा गौरव केला होता. बुद्धांचा हा उपदेश आणि त्याबरोबर मातंग पंडिताचा इतिहास आधुनिक काळातही एका घटनेमुळं अजरामर झालेला आहे. १९१२ साली सयाजीराव गायकवाड महाराजांनी बडोद्याच्या ज्युबिली पार्कमधे बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना करून ती मूर्ती बडोद्याच्या प्रजेला अर्पण केली. त्या मूर्तीच्या चबुतऱ्यावर महाराजांनी वेगवेगळ्या भाषेत बुद्धांचं वृषलाची व्याख्या करणारं हे वचन कोरलेलं आहे. माणूस आपल्या कृतीनं, ज्ञानानं आणि सद्गुणानं समाजव्यवस्थेची कुंपणं मोडून कसा झेपावू शकतो, त्याचं प्राचीन काळातलं मातंग पंडितांचं उदाहरण आणि आधुनिक काळातलं अण्णा भाऊंचं चरित्र यांची तुलना केली असता त्या दोघांमधलं साम्य आपल्याला विलक्षण आनंद देणारंही आहे आणि आपल्या एका महान वारशाची हृद्य आठवण करून देणारंही आहे."[२] ही तुलना शोषित, वंचित समाजाला नवे आत्मभान देणारी, प्रेरणा देणारी जशी आहे, तशी अण्णा भाऊंच्या जीवनप्रवासाचे मोठेपण सिद्ध करणारीही आहे.

अण्णा भाऊंच्या साहित्याची अनेक महत्त्वाची वैशिष्ट्ये डॉ. आ. ह. साळुंखे यांनी अधोरेखित केली आहेत. अण्णा भाऊंच्या साहित्यामागे मार्क्स, फुले, आंबेडकरी विचार आहे, हे सर्वज्ञात आहेच. वर्गसंघार्षाचे चित्रण अण्णा भाऊ जसे करतात तसेच जातीय संघर्षाचे चित्रणही करतात. श्रमिकांची जातिव्यवस्थेत होणारी पिळवणूक चित्रित करतात. म्हणून डॉ. आ. ह. साळुंखे यांना अण्णा भाऊ 'जाती आणि वर्ण यांच्या पलीकडे असलेल्या आणि श्रमाला प्रतिष्ठा देणाऱ्या श्रमणसंस्कृतीचा भारतीय वारसा' चालविणारे लेखकही वाटतात.

'इनामदार' या अण्णा भाऊंच्या नाटकाबद्दल त्यांनी केलेले विवेचन अभ्यासकांना नवी दृष्टी देणारे आहे. या नाटकातून श्रमिकांची एकजूट शोषणाची व्यवस्था उलथवून टाकू शकते, हा संदेश अण्णा भाऊंनी कसा दिला आहे, याचे अर्थपूर्ण विवेचन त्यांनी केले आहे. 'काळ समतेच्या दिशेनं बदलल्याचं चित्रण' अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून कसं केलेलं आहे, हे 'इनामदार' मधील उदाहरणं देऊन त्यांनी स्पष्ट केले आहे.

मराठी साहित्यातील परंपरागत स्त्रीचित्रणाला फाटा देत अण्णा भाऊंनी शोषणाशी दोन हात करणारी स्त्री आपल्या साहित्यातून उभी केली. स्त्री ही भोगवस्तू नसून तीही माणूस आहे, तिला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे, ही जाणीव घेऊन येणारे हे साहित्य आहे. त्यामुळे स्त्रीचित्रणाच्या दृष्टीने अण्णा भाऊंचे साहित्य हे नव्या जाणिवा घेऊन येणारे आहे. यासंदर्भात डॉ. आ. ह. साळुंखे यांनी अण्णा भाऊंच्या 'वैजयंता' या कादंबरीचे उदाहरण दिले आहे. तमाशात काम करणारी वैजयंता आपले स्वत्व कसे जपते, हे सांगून ते



Scanned by CamScanner

लिहितात, "अण्णा भाऊंच्या मनात तरळत असलेलं स्वाभिमानी स्त्रीचं चित्र हे असं आत्मतेजानं झळाळणारं आणि डोळे दिपवून टाकणारं होतं. प्रतिकूल परिस्थितीतही आपलं स्वत्व जपण्याचा वैजयंताचा हा निर्धार म्हणजे स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा अण्णा भाऊंनी केलेला उच्च कोटीचा आविष्कार आहे."[३]

याच भाषणात अण्णा भाऊंच्या जीवनप्रवासाचे अत्यंत अर्थपूर्ण विवेचन त्यांनी केले आहे. कोणत्याही व्यक्तीच्या जीवनाचा प्रवास कुठून कुठंपर्यंत केला, हे पाहणं त्यांना महत्त्वाचं वाटतं. या अण्णा भाऊंच्या जीवनप्रवासाचा आलेख मांडताना 'माझा रशियाचा प्रवास' मधील अण्णा भाऊंच्या विवेचनाचा दाखला देऊन ते लिहितात, "अण्णा भाऊंचा मुंबईकडचा पायी प्रवास आणि त्यांनी रशियातून परतताना विमानातून सर्वोच्च हिमालयाच्या मस्तकावरून केलेला प्रवास या गोष्टी प्रतीकात्मक आहेत, असं मला वाटतं. या दोन अवस्थांची तुलना अण्णा भाऊंच्या चरित्राचा अवघा आलेख आपल्यासमोर मांडते. पण हे प्रतीक केवळ अण्णा भाऊ या एका व्यक्तीच्या जीवनप्रवासापुरतं मर्यादित नाही. ते एक अस्सल प्रातिनिधिक चित्र आहे. आपल्या समाजातील शोषित लोकांच्या अंतर्यामी किती विपुल अंतःशक्ती असतात आणि त्यांना संधी मिळाली असता ते किती उन्नत होऊ शकतात, याचं हे वास्तव आणि महान प्रतीक आहे."[४]

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणात सुचविल्याप्रमाणे रशियात अण्णा भाऊंचे यथोचित स्मारक किंवा अध्यासन उभं करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन करून या भाषणाच्या शेवटच्या टप्प्यात डॉ. आ. ह. साळुंखे यांनी एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा चर्चेला घेतला आहे. भारतीय समाज हा वर्ण-जातींनी बनलेला समाज आहे. या वर्ण-जातीच्या विरुद्ध अनेक महामानवांनी संघर्ष केलेला आहे. स्वजातीतील महामानावाबद्दल भारतीयांना अत्यंत जवळीक वाटते. प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने ही जवळीक स्वाभाविक असली तरी त्यापुढे जाऊन महामानव समजून घेणे कसे आवश्यक आहे, हे सांगताना ते म्हणतात, "आपला समाज जातीपातींमध्ये विभागलेला असला, तरी आपल्याला जातीपातींनी निर्माण केलेली विषमता, भेदभाव, शोषण दूर करून समतेवर आधारलेला आणि त्यामुळं एकजीव बनलेला समाज निर्माण करायचा आहे. खरं तर आपल्या मनात हे स्वप्न आपलं श्रद्धास्थान बनलेल्या या महामानवांनीच पेरलेलं आहे आणि म्हणूनच आपण आपल्या कोणत्याही महामानवाला केवळ आपल्या जातीमध्ये बंदिस्त करता कामा नये...आपल्या समाजाच्या सर्व स्तरांतील, सर्व समूहांतील लोकांनी आपल्या समाजाच्या सर्व समतावादी महामानवांना आपलं श्रद्धास्थान मानणं, हाच या सर्व महामानवांचा संदेश आहे आणि आपण तो आचरणात आणणं, हेच आपण केलेलं त्याचं अनुसरण आहे, हाच त्यांचा गौरव आहे, हाच त्यांचा जयजयकार आहे."[५] समतावादी महामानवांकडे पाहण्याचा हा सम्यक दृष्टीकोन भारतीय समाजाने नीटपणे लक्षात घ्यायला हवा. असे झाले तरच या महामानवांना अभिप्रेत असलेली समताधिष्ठित समाजव्यवस्था अस्तित्वात येऊ शकते.

'अण्णा भाऊ हा अक्षरांच्या दुनियेतील एक वास्तव आणि सुखद चमत्कार' हे या भाषणसंग्रहातील अण्णा भाऊंच्या साहित्यावरील दुसरे भाषण आहे. १६ फेब्रुवारी २०१३ रोजी पुणे येथे भरलेल्या अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनाचे हे अध्यक्षीय भाषण आहे. या भाषणातूनही अण्णा भाऊंच्या साहित्याचे अनेक नवे पैलू, नवे संदर्भ आले आहेत.

रूढ अर्थाने अण्णा भाऊंचे कोणतेही औपचरिक शिक्षण झालेले नसताना त्यांनी मराठी साहित्याला दिलेलं योगदान डोळे दिपवून टाकणारं आहे, यात शंका नाही. यासंदर्भात डॉ. साळुंखे म्हणतात, "अण्णा भाऊ हा अक्षरांच्या, शब्दांच्या दुनियेमधील एक वास्तव आणि सुखद चमत्कार आहे. ज्याला परिस्थितीमुळं थोडंही औपचारिक शिक्षण घेता आलं नव्हतं, त्यानं पुढच्या आयुष्यात शब्दांना आपल्या लेखणीच्या टोकावर अक्षरशः नाना प्रकारची नृत्यं करायला लावली, हा साहित्याचा क्षेत्रातील, भाषेच्या विश्वातील चमत्कार नव्हे तर काय?"[६] अण्णा भाऊंच्या साहित्याची भाषा, तिचे शब्दसामर्थ्य पहाता हा गौरव अगदी सार्थ वाटतो.



Scanned by CamScanner

सामाजिक परिवर्तन हा अण्णा भाऊंच्या साहित्याचा ध्यास आहे. त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त होणारी प्रत्येक जाणीव कोणत्याना-कोणत्या अंगाने समाजपरिवर्तनाशी नाते सांगणारी असते. समाजातील परिवर्तन हे एकतर्फा होऊन चालत नाही, ते दुतर्फा अर्थातच दुहेरी स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. हे सांगून अण्णा भाऊंच्या साहित्यात या दुहेरी परिवर्तनाचं चित्रण कसं प्रभावी रीतीनं आलेलं आहे हे पटवून सांगण्यासाठी 'पेंग्याचे लग्न' या लोकनाट्याचं उदाहरण त्यांनी दिलं आहे. यातील पुतळा "मी काही गाय नव्हे" अशी घोषणा करून आपल्या स्वातंत्र्याच्या प्रेरणा कशा दाखवून देते, याचे सुंदर विवेचन लेखकाने केले आहे. या लोकनाट्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू लेखकाने मांडला आहे. गावकराशी संघर्ष करताना गणू, राणू आणि पुतळा परिवर्तनाच्या वाटेवर एकमेकांना साथ देत स्वतःचा स्वाभिमान कशा पद्धतीने जपतात, याचे अत्यंत मार्मिक वर्णन लेखकाने केले आहे. परिवर्तनाच्या लढाईत अगदी स्वतःच्या घरातच विरोध होत असतो. एखादा नवा, न्यायावर आधारलेला निर्णय घेत असताना घरातील इतर मंडळी अशा निर्णयाला प्रचंड विरोध करतात. या पार्श्वभूमीवर हे लोकनाट्य भारतीय समाजाला, कुटुंबाला नवी दृष्टी देणारे आहे. 'पेंग्याचे लग्न' या वरवर साधारण वाटणाऱ्या लोकनाट्यात किती महत्त्वाचे पैलू आहेत, हे या विवेचनातून लक्षात येते.

भाषणाच्या पुढच्या भागात 'अकलेची गोष्ट' या लोकनाट्यातील परिवर्तनवादी जाणिवा डॉ. साळुंखे यांनी मांडल्या आहेत. कापडाचा व्यापारी गुंडू आणि शेतकरी जानबा यांच्यातील संघर्ष कसा नव्या समाजपरिवर्तनाच्या जाणिवा घेऊन येणारा आहे, हे त्यांनी अनेक उदाहरणं देऊन पटवून दिले आहे. जानबा सतत परिवर्तनाची भाषा बोलत असल्यामुळे गुंडू जानबाला आणि किसान सभेला दूषणं देतो. तेव्हा जानबा गुंडूला म्हणतो, "अरं जा रं, तुझ्यासारखी कुत्री लई भुंकून गेल्याती. हिटलरसारख्यांची पायली भरून पालथी झाली, मग तुझ्यासारख्याचं मापटं कोलमडायला कितीसा वेळ लागणार!" या जानबाच्या तोंडी आलेल्या संवादाचे अत्यंत सुंदर विवेचन डॉ. आ. ह. साळुंखे यांनी केले आहे. ते लिहितात, "जानबासारख्या शेतकऱ्यांचा आणि त्यांच्या चळवळींचा सर्वनाश व्हावा म्हणून गुंडू काकाच्या तोंडातून शिव्याशाप बाहेर पडू लागले. परंतु जानबा हा आता पूर्वीच्या शेतकऱ्यासारखा अज्ञानी राहिलेला नाही. तो आता आरपार बदलेला आहे. हिटलरच्या नाशामुळं तर जानबासारख्यांना अधिक जोर आणि जोम आला आहे. त्यांनं शेतकऱ्याच्या संस्कृतीमधलं एक छान उदाहरण दिलं आहे. पूर्वीच्या काळी कोळवं, चिपटं, मापटं, पायली अशी धान्य मोजण्याची मापं होती. मापट्याच्या तुलनेत पायली हे खूप मोठं माप होतं. जानबा हिटलरला पायली म्हणत आहे. हिटलरच्या तुलनेत त्याला गुंडू काका मापट्यासारखा वाटत आहे. आता, जिथं पायलीच पालथी होते, तिथं मापटं कलंडायला वेळ लागू शकत नाही."[७]

सामाजिक परिवर्तनासाठी प्रबोधन आणि युक्तिवादाबरोबरच भावनात्मक आवाहन किती महत्त्वाचं असतं, हे पटवून देण्यासाठी लेखकाने अण्णा भाऊंच्या 'मरिआईचा गाडा' या प्रसिद्ध कथेचा दाखला दिला आहे. मरीआईचा गाडा सोडण्यावरून नाना पाटील आणि गावातील जुनी मंडळी यांच्यात संघर्ष निर्माण होतो. याप्रसंगी नाना पाटील हा तरुण प्रारंभी गावातील म्हाताऱ्या माणसांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. तरीही हे लोक ऐकायला तयार नाहीत, हे लक्षात आल्यानंतर तो एक नवी युक्ती वापरतो. मरीआईचा गाडा शिवेच्या बाहेर नेऊन कोणत्याही दिशेला सोडला तर त्या दिशेला असणाऱ्या गावामध्ये आपल्या गावातील काही मुली दिल्या आहेत, हे लक्षात आणून देतो. त्यामुळे त्यांच्यावर संकट येणं म्हणजे आपल्यावर संकट येण्यासारखे आहे, हे तो पटवून देण्यात यशस्वी होतो. त्यामुळे मरीआईचा गाडा शिवेवर नेऊन सोडण्याचा विचार बाजूला पडतो. यासंदर्भात डॉ. साळुंखे यांनी केलेले विवेचन अतिशय मर्मग्राही आहे. ते लिहितात, "समाजामधे काही परिवर्तन घडवून आणू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना कमालीची मार्गदर्शक ठरणारी अशी ही कथा आहे. शेकडो, किंबहुना हजारो वर्ष समाजामधे एखादी अनिष्ट प्रथा रुजलेली असते. परिवर्तनवादी



Scanned by CamScanner

कार्यकर्ते ही प्रथा नष्ट करू इच्छितात. ही बाब स्वागतार्हच आहे. परंतु काही वेळा हे कार्यकर्ते एक तर अती उतावीळ असतात किंवा कोरडेपणानं, भावनाशून्य, रुक्ष युक्तिवाद करतात. अशा युक्तिवादांचा लोकांच्या मनावर अनुकूल प्रभाव पडत नाही... लोकांच्या जीवनात बदल घडवून आणायचे असतील, तर त्यांच्या मनात प्रवेश करणं आवश्यक असतं. त्यांना जिव्हाळा वाटेल असं वागणं, त्यांच्या जीवनाशी भावनिक बंध जोडणं महत्त्वाचं असतं. भावनाचं नातं न जोडता, केवळ कोरडे युक्तिवाद करून लोकांना अनिष्ट प्रथा सोडायला भाग पाडता येत नाही. याउलट, बौद्धिक युक्तिवादाबरोबरच त्यांच्याशी भावनात्मक नातं जोडलं, तर त्यांच्या जीवनात नवा प्रकाश आणणारं परिवर्तन घडवता येत, हा धडा देण्याचं काम अण्णा भाऊंची ही कथा करते."८

या भाषणात 'संघर्ष' या कादंबरीचा दाखला देऊन केलेलं विवेचनही वर्तमान समाजवास्तवाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. पाटील घराण्यातील सुलभा नावाच्या मुलीचा जीवनसंघर्ष या कादंबरीत आहे. वडील एका चारित्र्यहिन मुलाबरोबर तिचे लग्न लावून देतात. नंतर ती घटस्फोट घेऊन आनंद नावाच्या तरुणासोबत पुनर्विवाह करते. भारतीय समाजात वर्तमानातही अनेक कुटुंबात घटस्फोटीत आणि विधवा महिलांचे पुनर्विवाह होऊ दिले जात नाहीत. डॉ. आ. ह. साळुंखे यांना अशा कुटुंबांसाठी ही कादंबरी आजही दिशादर्शक वाटते.

पुढे भाषणात 'सापळा' या अण्णा भाऊंच्या कथेचे विवेचन आले आहे. ही कथा नव्या परिवर्तनवादी जाणिवा घेऊन येणारी आहे. या कथेसंदर्भात ते म्हणतात, " 'सापळा' या कथेमध्ये आपल्या समाजात अर्धशतकापूर्वी डॉ. बाबासाहेबांच्या युगप्रवर्तक कार्यामुळं झालेलं एक परिवर्तन अण्णा भाऊंनी रेखाटलं आहे. अतिशय उद्दामपणानं वागणारे देशमुख, पाटील यांनाही अखेरीस नव्या काळाची पावलं ओळखून परिवर्तनास तयार व्हावं लागतं, असा या कथेचा शेवट आहे. हा शेवट आवर्जून पाहण्यासारखा आहे. हरीबा हा त्या गावातील महार समाजाचा नेता असतो. तो गावानं लावलेला बहिष्काराचा सापळा मोडून काढतो आणि अखेरीस पाटील असहाय होतो. अण्णा भाऊंनी रंगवलेला तो संवाद पुढीलप्रमाणं आहे, " 'आता त्यो सापळा आम्ही काढून टाकतो.' पाटील म्हणाला, 'हातनं म्होरं आपण सरळ वागू या –' 'सरळ कसं ?' मध्येच हरीबानं विचारलं आणि पाटील म्हणाला, आरं बाबा मानसावानी !' हे ऐकून हरीबानं निःश्वास टाकला. तो निःश्वास हरीबानं किती तरी दिवस दाबून धरला होता."९ अण्णा भाऊंच्या कथेतील हा सगळा संघर्ष, सगळी धडपड माणूस म्हणून जगण्यासाठीच कशी आहे, याचे पुढे विवेचन आले आहे. तेही अतिशय उद्बोधक असे आहे.

याच भाषणामध्ये अण्णा भाऊंच्या भाषाशैलीचाही गौरव लेखकाने केला आहे. अण्णा भाऊंच्या साहित्याची भाषा ही बहुआयामी आहे. ती आशय-विषयानुसार आपले रूप बदलत असली तरी तिच्यातील लोकबोलीचे तत्त्व अस्सल आणि जिवंत आहे. त्यांनी साहित्यनिर्मितीसाठी वापरलेली बोली ही अतिशय सहजसुंदर, जिवंत, प्रवाही आहे. तिच्यात कुठेही कृत्रिमपणा नाही. उत्कटपणा हा तिचा स्वभाव आहे. म्हणून ते म्हणतात, "अण्णा भाऊ जी भाषा लिहितात, ती इतकी अस्सल असते, कि त्यांना जणू काही ती आईच्या नाळेतूनच मिळाली होती, असं वाटल्याखेरीज रहात नाही."१०

साहित्य आणि समाजप्रबोधन यांचा घनिष्ठ संबंध राहिलेला आहे. समाजप्रबोधन करणाऱ्या साहित्याला प्रचारकी साहित्य म्हणून बाजूला करणे, हे त्या साहित्यावर अन्याय करणारे आहे. या अनुषंगाने अगदी आपल्या या भाषणाच्या शेवटी डॉ. आ. ह. साळुंखे यांनी मांडलेला मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. अण्णा भाऊंनी कलेचे सर्व नियम पाळून समाजाचं प्रबोधन केलेलं आहे, असा त्यांच्या विवेचनाचा सार आहे. केवळ मनोरंजनात अडकून न पडता, रसिकाला, वाचकाला आनंद देत देत त्यांनी त्यांचे प्रबोधनही घडवून आणले, हे अण्णा भाऊंच्या साहित्याचे वेगळेपण आहे, असे त्यांना वाटते.

Scanned by CamScanner

अण्णा भाऊंच्या साहित्यविश्वातील परिवर्तननिष्ठ, पुरोगामी जाणिवा नेमकेपणाने शोधून, त्या जाणिवांची प्रासंगिकता आणि त्यांचे वर्तमान काळातील समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने असणारे मूल्य, लक्षात आणून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या दोन भाषणातून डॉ. आ. ह. साळुंखे यांनी केले आहे.

'अण्णा भाऊ साठे – एक सत्यशोधक' या मच्छिंद्र सकटे यांच्या ग्रंथास लिहिलेल्या प्रस्तावनेतून त्या ग्रंथातील जाणिवांच्या आणि मांडणीच्या अनुषंगाने महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. अण्णा भाऊंच्या साहित्याचे अनेकांनी अनेक पद्धतीने मूल्यमापन केले आहे. कुणी अण्णा भाऊंना मार्क्सवादी म्हटले, तर कुणी आंबेडकरवादी. कुणी जनवादी, तर कुणी सत्यशोधकी.

या पार्श्वभूमीवर या प्रस्तावनेत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केलेले मत आणि दिलेले उदाहरण अतिशय महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, "काही अभ्यासकांनी आपापल्या दृष्टिकोनानुसार अण्णा भाऊंना एखाद्या पंथात वा 'वादा'त बंदिस्त करण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो पाहिल्यावर महात्मा चक्रधरांनी दिलेला जन्मांध व्यक्ती आणि हत्ती यांचा दृष्टान्त आठवतो. काही जन्मांध व्यक्ती हत्तीच्या एकेका अवयवाला स्पर्श करतात आणि तो अवयव म्हणजेच संपूर्ण हत्ती, असे त्यांना वाटते. त्यावेळी हा हत्तीचा एक-एक अवयव आहे; तो संपूर्ण हत्ती नव्हे. जो या अवयवांनी युक्त असतो, तो हत्ती, असे एक डोळस मनुष्य त्यांना समजावून सांगतो. अण्णा भाऊंच्या बाबतीतही आपणाला अशीच डोळस आणि विवेकी भूमिका घ्यावी लागेल. एकीकडून अण्णा भाऊंचे मार्क्सबरोबरचे नाते अतूट होते आणि दुसरीकडे अण्णा भाऊ बुद्ध-फुले-आंबेडकर यांचाही वारसा चालवित होते, हीच त्यांच्याविषयीची सम्यक भूमिका होऊ शकते."११ शोषणमुक्तीचा विचार अण्णाभाऊंना नेहमीच प्रेरक वाटत आला आहे. हे लक्षात घेऊन त्यांच्या साहित्याचा अन्वयार्थ लावायला हवा. प्रस्थापित व्यवस्थेकडून अण्णा भाऊंची जशी उपेक्षा झाली तशी स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या गटातटांकडूनही उपेक्षा झाली. "मी अस्पृश्यांत अस्पृश्य झालो" अशी खंत स्वतः अण्णा भाऊंनीच कॉ. शरद पाटील यांच्याकडे व्यक्त केली होती.१२ मार्क्स, गॉर्की, फुले, आंबेडकर यांच्या विचाराची पताका आयुष्यभर खांद्यावर घेऊन अण्णाभाऊ लढत राहिले. त्यांची प्रतिभा झुंजत राहिली. हे वास्तव लक्षात घेतले तर अण्णा भाऊंचे माणूस आणि कलावंत म्हणून असणारे मोठेपण आपल्या लक्षात येते.

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी अण्णा भाऊंच्या साहित्याच्या संदर्भात केलेले हे विवेचन अनेक महत्त्वाचे विशेष सांगणारे, त्यांच्या साहित्याकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे, चिंतनशील आणि उद्बोधक आहे. एखाद्या परिवर्तनवादी लेखकाच्या साहित्याकडे अनेक अंगांनी कसे पहाता येते आणि त्या साहित्यातील जाणिवा, मूल्ये समाजपरिवर्तनासाठी आजही प्रेरक ठरणाऱ्या कशा आहेत, याची जाणीव या मांडणीतून झाल्याशिवाय रहात नाही. खरेतर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावरील हे चिंतन म्हणजे समाजपरिवर्तनाच्या चळवळीला अधिक गतिमान, सशक्त करण्याचा आणि डोळस बनविण्याचा विवेकी प्रयत्न होय. हा प्रयत्न परिवर्तनाच्या लढ्याला नक्कीच नवे बळ प्राप्त करून देणारा ठरणार आहे, यात शंका नाही.

**संदर्भसूची :**

1. साळुंखे आ. ह. 'हृदयातून हृदयांकडे', लोकायत प्रकाशन, सातारा प्रथम आवृत्ती जून २०१३, पृष्ठ ८७-८८.
2. तत्रैव, पृष्ठ ८९
3. तत्रैव, पृष्ठ ९२
4. तत्रैव, पृष्ठ ९३



Scanned by CamScanner

2348-7143
November-2018

5. तत्रैव, पृष्ठ ९५
6. तत्रैव, पृष्ठ ९६
7. तत्रैव, पृष्ठ ९९, १००
8. तत्रैव, पृष्ठ १०१
9. तत्रैव, पृष्ठ १०२
10. तत्रैव, १०३
11. सकटे मच्छिंद्र : 'अण्णा भाऊ साठे - एक सत्यशोधक', प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती ३ जाने. २००५, पृष्ठ २३.
12. गायकवाड आसाराम(सं.): 'लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे संदर्भ ग्रंथ' झेप प्रकाशन नाशिक, प. आ. १९९८, पृ. २३६.



Scanned by CamScanner